# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/10/2023 (सोमवार) सायंकाळ

---

### कोळसा चोरी

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत ११ किमी अंतरावर मौजा हिंगणा बाराभाई ते साहोली रोड सिंगोरी खदान डम्पींग परिसर येथे दिनांक २९/१०/२०२३ चे ०३.३० वा. ते ०३.४५ वा. दरम्यान **आरोपी नामे– १) रजत मंगेश मेश्राम वय ३२ वर्ष, रा. गरांडा त. पाशिवनी २) संदीप प्रभु हुमने वय ३९ वर्ष रा. सिंगोरी ह. मु. गरांडा त. पारशिवनी** यांनी संगनमत करून हिरो पॅशन प्रो. मोटरसायकल क्र. एम. एच.–४०/ ए. ई– ५८२५ किंमती १००००/–रू व बजाज प्लॅटीना मोटरसायकल क्र. एम.एच.– ४०/ए.एच. –६५३५ किंमती ८०००/– रू वर सिंगोरी खदान डम्पींग परिसरातील दगडी कोळसा ४ बोरी मध्ये वजन २२० किलो किंमती १३२०/– रू असा एकुण किंमती १९३२०/– रूपयाचा मुद्देमाल घेवुन जातांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९,३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सुरेश धुर्वे पोस्टे पारशिवनी मो. नं. ९९२२९ ३५८७८ हे करीत आहे.

### मोटारपंप चोरी

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत ०३ किमी अंतरावर मौजा दिगलवाडी शिवार येथे दिनांक २८/१०/२०२३ चे १८.०० वा. ते दि. २९/१०/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान दिगलवाडी शेत शिवारातील फिर्यादी नामे– मधुकर रामाजी थोटे, वय ६० वर्ष, रा. दिगलवाडी त. पारशिवनी यांचे शेतातील नाल्यावर लावलेली किसान कंपनीची ३ हॉर्स पॉवर ची पाण्याची पानबुडी इलेक्ट्रीक जुनी मोटार किंमती १२,०००/–रू ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सुरेश धुर्वे पोस्टे पारशिवनी मो. नं. ९९२२९ ३५८७८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर